




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here



वर्ष : ०६ | अंक : ३९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२२ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# पुणे जिल्ह्यातील राजकारण तापलं!

## डीपीसीच्या निधीसाठी आमदारांच्या वर्चस्वाला आता जि.प. सदस्यांकडून आव्हान

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, पुणे :** जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) निधीवरून पुणे जिल्ह्यातील राजकारण तापण्याची चिन्हे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर जिल्हा परिषद पुन्हा अस्तित्वात आल्याने डीपीसीच्या निधीवर आतापर्यंत असलेल्या आमदारांच्या वर्चस्वाला आता जिल्हा परिषद सदस्यांकडून आव्हान देण्याची शक्यता आहे. आपल्या मतदारसंघात विकासकामे आणून राजकीय श्रेय मिळविण्यासाठी आमदारांसह जिल्हा परिषद सदस्यांनीही निधीसाठी 'फिल्डिंग' लावली आहे.

यंदाच्या जिल्हा वार्षिक आराखड्यात मोठी आर्थिक तरतूद असतानाच निधीवाटपाच्या नव्या सूत्रामुळे संघर्षाला राजकीय किनार मिळाली आहे. राज्य सरकारने डीपीसीच्या निधी वाटपाचे सूत्र निश्चित केले आहे.६० टक्के आमदार- लोकप्रतिनिधी, ३० टक्के पालकमंत्री आणि १० टक्के निधी विधान परिषद आमदार आणि खासदार असे सूत्र आहे. आमदारांच्या शिफारशींना मोठा वाटा देण्याच्या नव्या सूत्राची चर्चा सुरू असताना, जिल्हा परिषद सदस्यांनीही त्यांच्या मतदारसंघातील कामांसाठी स्वतंत्र निधीची मागणी सुरू केली आहे. त्यामुळे 'निधी कोणाच्या माध्यमातून आला?' आणि 'कामाचे श्रेय कुणाला मिळणार?' यावरून महायुतीतील स्थानिक राजकारणात नवी रस्सीखेच सुरू होण्याची शक्यता आहे. जिल्हा प्रशासनाने लोकप्रतिनिधींकडून विकासकामांच्या याद्या मागविल्या आहेत. दिवंगत नेते अजित पवार पालकमंत्रिपदाच्या काळात आमदारांच्या विकासकामांना 'डीपीसी'चा मोठ्या प्रमाणात निधी देत असे. आता जिल्हा परिषद अस्तित्वात आल्याने समीकरण बदलले आहे. नव्या सदस्यांना आपल्या मतदारसंघात कामे दाखविण्यासाठी निधी हवा आहे.



आपल्या विधानसभा मतदारसंघातील राजकीय पकड कायम ठेवण्यासाठी आमदारांना डीपीसीचा निधी महत्त्वाचा आहे. निवडणुकीनंतर पुणे जिल्ह्यातील नव्या जिल्हा परिषद सदस्यांकडेही स्वतंत्र राजकीय ताकद निर्माण झाली आहे. त्यामुळे विकासकामांचे उद्घाटन, भूमिपूजन आणि त्याचे श्रेय यावरून भविष्यात आमदार आणि जिल्हा परिषद सदस्यांमध्ये संघर्षाची शक्यता आहे. आमदारांनीही आपल्या मतदारसंघातील कामांची यादी तयार केली आहे. लोकप्रतिनिधींकडून कामांच्या याद्या मागविण्यात आल्या असल्या, तरी यादी पाठविणे आणि निधी मिळणे यात मोठा फरक आहे. कोणती कामे प्राधान्याने घ्यायची, कोणत्या कामांना निधी द्यायचा आणि उपलब्ध निधीत कोणाचा प्रस्ताव किती पुढे न्यायचा, यावर पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या भूमिकेला महत्त्व राहणार आहे. विशेष म्हणजे आमदारांना मोठा हिस्सा देण्याच्या नव्या सूत्राच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्र्यांच्या अखत्यारीतील निधीचा वापर महायुतीतील विविध घटकांमध्ये कसा होतो, हेही महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे आमदारांसह जिल्हा परिषदेच्या सदस्यांना खूश ठेवण्यात पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना कसरत करावी लागणार आहे.

---

## वडगाव सावताळला मुळा धरणातून उपसा सिंचन योजना मार्गी लावा : शिवाजी रोकडे

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.२१,पारनेर (अहिल्यानगर) :** वडगाव सावताळ येथील सहा तलावांमध्ये मुळा धरणातून उपसा सिंचन योजनेद्वारे पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी भाजपचे जिल्हा सरचिटणीस शिवाजी रोकडे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे. रोकडे यांनी विखे पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेऊन समस्त ग्रामस्थांच्या वतीने याबाबत निवेदन दिले.

वडगाव सावताळ शिवारात ब्रिटिशकालीन तलाव, लिंग ओहोळ तलाव, शिंदे मळा तलाव, खामकर झाप तलाव, पांढरी तलाव आणि गाजदिपूर तलाव असे सहा तलाव आहेत. या तलावांमुळे गावातील सुमारे ४० ते ५० टक्के क्षेत्र ओलिताखाली येते. मात्र, पाऊस कमी झाल्यास तलावांतील पाणीसाठा डिसेंबरअखेर संपतो. त्यानंतर शेतीसह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. रब्बी हंगामातील पिकांनाही याचा मोठा फटका बसतो.

मुळा नदी गावाच्या जवळून जात असल्याने मुळा धरणातून उपसा सिंचन योजना राबवून या सहाही तलावांमध्ये पाणी सोडल्यास परिसरातील शेतीला कायमस्वरूपी सिंचनाचा आधार मिळू शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

> ● वडगाव सावताळच्या सहा तलावांमध्ये मुळा धरणातून पाणी आणल्यास शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागू शकतो. या मागणीसाठी ग्रामस्थांच्या वतीने मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत अधिकाऱ्यांना पाहणी व सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे या योजनेला गती मिळण्याची अपेक्षा आहे.
> **– शिवाजी रोकडे (जिल्हा सरचिटणीस भाजप)**

---

## खापरखेडा औष्णिक वीज केंद्राची सुरक्षा म्हणजे 'उपरसे टापटीप अंदरसे राम जाने'

### खापरखेडा औष्णिक वीज केंद्रातून पुन्हा कॉपर वायर चोरी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात कॉपर चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. वीज केंद्र परिसराला हायटेक सुरक्षा प्रधान करण्यात आली, मात्र सातत्याने चोऱ्या वाढल्याने खापरखेडा औष्णिक वीज केंद्राची सुरक्षा म्हणजे उपरसे टापटीप, अंदरसे रामजाने झाली आहे.

औष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरातून सुमारे २५ हजार रुपये किमतीची कॉपर वायर चोरीला गेल्याचा प्रकार १९ सप्टेंबर शनिवारला मध्यरात्री उघडकीस आला आहे.

खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात चोरीवर नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीकोनातून क्यूआरटी पथक तयार करण्यात आले आहे. शनिवारी मध्यरात्री क्यूआरटी पथक पेट्रोलिंग करीत असताना काही अज्ञात आरोपी कॉपर वायर घेऊन जात असल्याचे निदर्शनास आले. पथकाने पाठलाग करून लक्ष्मीनारायण सूर्यवंशी याला ताब्यात घेतल्याचे पोलीस तक्रारीत नमूद केले आहे.



त्याच्याकडून दोन ते तीन किलो कॉपर वायर मिळून आल्याचे सांगण्यात आले. चौकशीत मुकेश तायवाडे व मुसा ऊर्फ रमेश वरनकर यांची नावे समोर आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. केंद्रातून अंदाजे २० ते २५ किलो कॉपर वायर चोरीला गेल्याचा दावा करण्यात आला आहे.

याप्रकरणी कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा) रविराज मोहन भगत यांनी खापरखेडा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिस उपनिरीक्षक विलास गोमाजी करंगामी तपास करीत असून तक्रारीतील आरोपांची सत्यता तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

---

## गणेश विसर्जनापूर्वी दिव्यातील फेरीवाले हटवा सचिन भोईर यांची महापालिकेला तंबी

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.२१, दिवा (ठाणे) :** गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर दिवा-साबे रोड, दिवा-शील रोड आणि दिवा-आगासन रोडवर मोठ्या प्रमाणात फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्याने वाहतूक कोंडी आणि नागरिकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. हा त्रास तात्काळ दूर करण्यासाठी फेरीवाल्यांना तातडीने हटवण्याची मागणी भारतीय जनता पार्टी दिवा शहर अध्यक्ष सचिन भोईर यांनी केली आहे.

या संदर्भात त्यांनी आज दि.२१ सप्टेंबर २०२६ रोजी दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांना निवेदन दिले असून त्यावर आवक क्र. ३३४२नोंदवण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, विसर्जन मिरवणुकीत हजारो नागरिक सहभागी होणार आहेत. त्यामुळे या मुख्य मार्गांवरील फेरीवाले तातडीने हटवून रस्ते मोकळे करावेत. तसेच विसर्जन पूर्ण होईपर्यंत या मार्गांवर फेरीवाले पुन्हा बसणार नाहीत, याची प्रशासनाने कठोरपणे दक्षता घ्यावी.

गणरायाला मोकळा मार्ग आणि दिवेकरांना सुरक्षित रस्ता मिळालाच पाहिजे. याबाबत तातडीने प्रत्यक्ष कारवाई करावी, अन्यथा नागरिकांच्या रोषाला प्रशासनाला सामोरे जावे लागेल, असा इशारा सचिन भोईर यांनी दिला आहे.

यावेळी स्थानिक नागरिकांनीही भाजपच्या या मागणीला पाठिंबा दर्शवला आहे.

---

## तवा येथे दुधाचा टँकर पलटी; दूध घेण्यासाठी नागरिक, वाहनचालकांची झुंबड

# लाखो लिटर दूध रस्त्यावर सांडले !

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२१, डहाणू (पालघर) :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर तवा येथे सोमवारी (दि. २१) दुपारी तीनच्या सुमारास अमूल कंपनीचा दुधाचा टँकर पलटी झाल्याची घटना घडली. गुजरातहून विरारच्या दिशेने जाणारा GJ 19 X 8250 क्रमांकाचा दुधाचा टँकर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने डिव्हायडरला धडकला. त्यानंतर टँकर मुंबई वाहिनीवरून थेट गुजरातच्या दिशेच्या वाहिनीवर जाऊन पलटी झाला.

या अपघातात टँकरमधील मोठ्या प्रमाणात दूध रस्त्यावर सांडल्याने महामार्गावर अक्षरशः दुधाचे लोट वाहत होते. टँकर पलटी झाल्यानंतर त्यामधून मोठ्या प्रमाणात दूध रस्त्यावर सांडले. दूध मोठ्या अंतरापर्यंत पसरल्याने लाखो लिटर दूध वाया गेल्याचे सांगण्यात येत आहे. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिक तसेच महामार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांनी घटनास्थळी गर्दी केली. काहींनी बाटल्या, प्लास्टिकचे ड्रम तसेच मिळेल त्या भांड्यांचा वापर करून टँकर मधील निघत असलेले दूध घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे काही काळ घटनास्थळी नागरिक आणि वाहनचालकांची दूध घेण्यासाठी मोठी झुंबड उडाली होती.



दरम्यान, अपघातानंतर टँकरचालक घटनास्थळावरून पसार झाल्याची माहिती काही प्रथमदर्शींनी दिली. मात्र, चालक नेमका कोणत्या परिस्थितीत घटनास्थळावरून निघून गेला, याबाबत अधिकृत माहिती मिळू शकलेली नाही. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग प्राधिकरणाची रुग्णवाहिका, पेट्रोलिंग वाहन तसेच कासा पोलिस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू केली.मात्र या घटनेमुळे गुजरात वाहिनीवर वाहनाच्या रांगा लागल्या होत्या.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर विविध ठिकाणी पडलेले खड्डे तसेच दिशादर्शक फलकांचा अभाव यामुळे अपघातांचा धोका वाढत असल्याची तक्रार वाहनचालकांकडून करण्यात येत आहे. यापूर्वीही या महामार्गावर अनेक अपघातांच्या घटना घडल्या आहेत. काही दिवसांपूर्वी चारोटी उड्डाणपुलावर रसायनयुक्त टँकर पलटी होऊन चालक जखमी झाला होता. महामार्गावरील अपघातांच्या घटनांनंतर रस्त्याची स्थिती, खड्डे, वळणांवरील सुरक्षाव्यवस्था तसेच दिशादर्शक फलकांचा अभाव हे मुद्दे पुन्हा ऐरणीवर येत आहेत. महामार्ग प्राधिकरणाने धोकादायक ठिकाणांची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.




## कर्मवीर भाऊराव पाटील

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज जयंती. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्या मनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्वना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्मप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, (२७ मुलींसाठी) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, (१ मुलींसाठी) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रोपट्याचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची १३९ वि जयंती. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. जयंतीदिनी कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# भक्तीला मोठेपणापेक्षा साधेपणा पुरेसा असतो

आपल्या या भारत देशाला हजारो वर्षांची परंपरा लाभलेली आहे. मात्र काही शतकाअगोदर परकीय आक्रमणांमुळे अनेक संकटाशी सामना करावा लागला तरीसुद्धा, अजूनही हजारो वर्षाची परंपरा कायम असून परंपरेप्रमाणे अनेक सण –समारंभ साजरे केले जातात. खेड्यापासून तर शहरापर्यंत वेगवेगळे सण–उत्सव व इतर धार्मिक कार्यक्रमाचे नियोजन केले जाते. दिनदर्शिकेतील तिथी व मुहूर्तानुसार सर्वजण एकत्रित येऊन परंपरा जोपसण्यासाठी सज्ज असतात. विशेषत: तरुण मंडळी यासाठी जास्त तप्तर असतात, कारण कुठल्याही देशातील तरुण वर्ग हाच देशाची ऊर्जा शक्ती असते. त्यांच्याहाती देशाचे भविष्य असते. त्यासह संस्कृती व परंपरा या पिढीकडून येणाऱ्या पिढीकडे सोपवण्याचे महान कार्य त्यांच्याच हाती असते. मात्र या महान कार्याचे वारसदार म्हणून लाभलेली आजची पिढी कुठेतरी भरकंटताना दिसतेय. सण –उत्सव साजरा करण्यामागील मुळ उद्देश लक्षात न घेता केवळ दिखावा जास्त प्रमाणात दिसून येतोय.

काळ बदलत चालला आहे. स्पर्धेच युग आहे. या स्पर्धेत टीकायला हवं. नाहीतर हे असं होईल ते तसं होईल अशी सर्वसाधारण भाषा सर्व क्षेत्रात कित्येकाच्या मुखातून ऐकायला येते. हल्ली नेमकं तसंच सण उत्सव तथा धार्मिक कार्याच्या बाबतीतही घडतांना दिसून येतंय. आज भक्ती वाढली आहे की भक्तीचा दिखावा वाढला आहे, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. मोठमोठे मंडप, महागड्या सजावटी, मोठ्या आवाजातील भजन–कीर्तन, सोशल मीडियावरील धार्मिक पोस्ट आणि स्टेटस. हे सगळे दिसते. पण या सगळ्यांच्या पलीकडे मनातली शांतता, माणुसकी आणि चांगले आचरण किती वाढले आहे? खरी भक्ती ही गाजावाजा करणारी नसते. ती मनाला नम्र करते, अहंकार कमी करते आणि दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव करून देते. साधेपणाच्या भक्तीचे सुंदर उदाहरण म्हणजे त्रेतायुगातील शबरीची भक्ती. शबरीकडे मोठी संपत्ती नव्हती, महागडे नैवेद्य नव्हते, भव्य मंदिर नव्हते. पण तिच्याकडे निष्कपट प्रेम, श्रद्धा आणि प्रतीक्षा होती. भगवान श्रीराम येतील या विश्वासाने ती रोज आश्रमाची स्वच्छता करायची आणि प्रेमाने बोरं गोळा करून ठेवायची. तिच्या भक्तीत दिखावा नव्हता, मनाची श्रीमंती होती. याच भावनेची संत परंपरेतही काहि उदाहरणे आपल्याला या पाच ते सात शतका अगोदरची सुद्धा दिसतात जसे कि, संत तुकाराम, संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर संत चोखोबा यांच्या भक्तीत बाह्य अवडंबरापेक्षा अंतःकरणातील श्रद्धा, नामस्मरण आणि मानवतेला महत्त्व दिसून येत होते.भक्ती ही मोठ–मोठे दिखावे, सजावटी किंवा धार्मिक स्थळावरच असते असे नाही, ती एखाद्या साध्या मनाच्या कोपऱ्यातही देवाला भेटू शकते. संतांच्या जीवनसंघर्षातून व आचरणपद्धतीतून त्याच्या भक्तीतील साधेपणा सारंशरुपाने समजून घेतांनाही आपल्याला हेच दिसून येईल. संत परंपरेतील संतश्रेष्ठ माऊली संत ज्ञानेश्वर महाराज यांनी अल्पायुष्यात ज्ञानेश्वरीसारखा महान ग्रंथ दिला. त्यांच्या विचारात ज्ञान, भक्ती आणि समत्व यांचा सुंदर संगम दिसून येतो. त्यांच्या जीवनातील संघर्ष आणि भक्तीतील साधेपणाने भगवंताला आपलंस केलं. संत नामदेव महाराज यांची विठ्ठलावरील भक्ती अत्यंत व्यक्तिगत आणि प्रेमपूर्ण होती. देवाशी नाते हे औपचारिकतेपेक्षा प्रेमाचे असावे, असा भाव त्यांच्या अभंगांत दिसतो. संत एकनाथ महाराज यांची भक्तीतील साधेपणा सांगायचा झाल्यास त्यांनी भक्तीबरोबर माणुसकी आणि समतेला महत्त्व दिले. साध्या माणसातही ईश्वर पाहण्याचा संदेश त्यांच्या कार्यातून दिसतो.

संत परंपरेतील महान संत म्हणून ओळखले जाणारे संत चोखोबा यांचा जीवनप्रवास अतिशय संघर्षमय होता. सामाजिक विषमतेचा सामना करत असतानाही त्यांची विठ्ठलभक्ती अढळ राहिली.त्यांच्या भक्तीत मनाची शुद्धता ही जन्मापेक्षा श्रेष्ठ असल्याचा संदेश दिसतो. संत परंपरेत महिला संतांचे सुद्धा योगदान व त्यांच्या भक्तीतील साधेपणा आपल्याला दिसून येतो. स्वतःला नामयाची दासी म्हणून घेणाऱ्या संत जनाबाई ह्या दैनंदिन घरकाम करतानाही नामस्मरण करत. जनाबाई म्हणजे कामातच भक्ती याचे सुंदर उदाहरण. हात कामात, मन नामात ही भावना त्यांच्या भक्तीला समर्पक ठरते. कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी म्हणणारे संत सावता माळी हे आपल्या शेताच्या मळ्यातील पिकांमध्ये विठू माउलीचे दर्शन घेत. शेतीचे काम करताना विठ्ठलाचे स्मरण ही अगदी साधीभोळी भक्ती. या भक्तीतून त्यांनी दाखवून दिले की भक्तीसाठी संसार सोडण्याची गरज नाही. कुंभारकाम करतानाही विठ्ठलनामात रमणारे गोरा कुंभार हे आपले कर्तव्य प्रामाणिकपणे करतानाही भक्ती करता येते याचे जिवंत उदाहरण आपल्याला दिसून येते.

सोनारकाम आणि भक्ती यांचा सुंदर मेळ त्यांनी साधला. आपला व्यवसायच साधना बनू शकतो, हा संदेश त्यांच्या जीवनातून मिळतो.

सोळाव्या शतकातील संत जगदगरू तुकोबाराय यांचे अतिशय साधे जीवन, त्यासह सतत विठ्ठलाचे नामस्मरण आणि समाजप्रबोधनासाठी अभंगरचना..! त्यांच्या भक्तीतून व संघर्षमय जीवनप्रवासातून भक्तीत दिखाव्यापेक्षा नामस्मरण व आत्मचिंतन महत्त्वाचे होते. हे दिसून येते. आधुनिक संत म्हणून ओळखले जाणारे संत गाडगे महाराज यांनी माणसातच देव शोधला. त्यांनी कर्मकांडापेक्षा स्वच्छता, सेवा, शिक्षण आणि अंधश्रद्धेला विरोध यांना महत्त्व दिले. त्यांच्या दृष्टीने गरजू माणसाची सेवा हीच खरी ईश्वरसेवा होती. अश्या या महानविभूतींनीं आपल्या भक्तीचा दिखावा मुळीच केला. म्हणून आजही शेकडो वर्षांनंतर त्यांचे गुणगान आपण गातो.

मित्रांनो,आजकालची ही सण उत्सवातील बिभत्सना, दिखाऊपणा, मोठेपणा, अवास्तव पैशाचा अपव्यय बघून कधी कधीअसे वाटते. भक्तीपेक्षा भक्तीचे प्रदर्शन चालू आहे. देवाला फुलांचा हार घालतो; पण माणसाच्या मनाला शब्दांनी जखम करतो. देवासाठी हजारो रुपये खर्च करतो, पण गरिबासाठी दहा रुपये देताना विचार करतो. देवापुढे नतमस्तक होतो, पण अहंकारापुढे मात्र मान झुकवत नाही. ही विसंगती दूर करण्याची गरज आहे. देवाला आपल्या सजावटीपेक्षा आपल्या आचरणाची गरज आहे. म्हणून आजच्या तरुणाईने एकच संकल्प करावादिखाव्याची भक्ती नको, आचरणाची भक्ती हवी. देवासाठी फक्त दिवा नको, तर माणुसकीसाठी मनातला दिवा पेटवूया!

**– विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि. बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

# पारनेरच्या पाचवीला पूजलेला दुष्काळ!

## पाऊस पडला तर अतिवृष्टी, नाही पडला तर दुष्काळ
## शेतकऱ्याच्या जगण्याचा प्रत्येक हंगाम निसर्गाच्या लहरीवर!

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुका हा मुख्यत्वे पर्जन्यछायेच्या प्रदेशात येत असल्याने येथील शेतकऱ्याचे आयुष्य आजही आभाळाकडे पाहत सुरू होते आणि आभाळाकडे पाहतच संपते. पाऊस पडला तर पीक वाचेल, पीक आले तर भाव मिळेल आणि भाव मिळाला तर कर्ज फेडता येईल, या आशेवर त्याची वर्षानुवर्षे शेती सुरू आहे. मात्र, या सगळ्या गणितात शेतकऱ्याच्या हातात उरतो तो केवळ खर्च, कर्ज आणि पुढच्या हंगामाची चिंता!




दुष्काळ हा पारनेरच्या शेतकऱ्यासाठी आता केवळ एखाद्या वर्षातील नैसर्गिक आपत्ती राहिलेली नाही. तो त्याच्या शेतीच्या नियोजनाचा, आर्थिक गणिताचा आणि भवितव्याचा अविभाज्य भाग बनला आहे. कधी पाऊस कमी पडतो, कधी पेरणीनंतर पावसाचा खंड पडतो, तर कधी पीक काढणीला आलेले असताना अतिवृष्टी आणि अवकाळी पाऊस घात करतो. त्यामुळे शेतकऱ्याच्या हातात आलेला घास निसर्ग पुन्हा हिसकावून घेतो.

पारनेरचा शेतकरी दुष्काळापेक्षा खूपच मोठा असून येथील शेतकऱ्याने अनेक वर्षे दुष्काळ पाहिला आहे. पिके करपताना पाहिली आहेत. अतिवृष्टीने शेत वाहून जाताना पाहिले आहे. बाजारभाव पडताना पाहिला आहे. कर्जाचे ओझे वाढताना पाहिले आहे. तरीही तो पुढच्या हंगामाची तयारी करतो. कारण त्याच्याकडे माती आहे, श्रम आहे आणि पुन्हा उभे राहण्याची जिद्द आहे. पारनेरच्या शेतकऱ्याला केवळ दुष्काळग्रस्त म्हणून पाहण्याची गरज नाही; त्याला पाण्याची शाश्वत व्यवस्था, उत्पादनाला योग्य बाजारभाव, शेतीला तंत्रज्ञान आणि उत्पन्नाला स्थैर्य देण्याची गरज आहे. दुष्काळ पारनेरच्या पाचवीला पूजलेला असला, तरी तो शेतकऱ्याच्या नशिबात कायमचा लिहिलेला नाही. पावसाचे प्रत्येक थेंब अडवला, जमिनीत मुरवला आणि शेतीच्या उपयोगात आणला; उत्पादनाला बाजारपेठ मिळवून दिली आणि शेतीची जोखीम कमी केली, तर या तालुक्याचा शेतकरी दुष्काळाशी लढत राहणारा नव्हे, तर दुष्काळावर मात करणारा शेतकरी ठरू शकतो.

शेतकऱ्याची अडचण केवळ पावसापुरती मर्यादित नाही. निसर्गाने साथ दिली आणि पीक चांगले आले, तरी त्याला योग्य बाजारभाव मिळेल याची शाश्वती नसते. उत्पादनाचा खर्च शेतकऱ्याने करायचा, निसर्गाची जोखीम त्याने घ्यायची आणि बाजारभावाचा धोका देखील त्यानेच सहन करायचा, अशी परिस्थिती अनेकदा निर्माण होते. पीक बाजारात आणल्यानंतर भाव घसरला, तर वर्षभर केलेल्या मेहनतीचे आर्थिक गणित बिघडते. उत्पादन चांगले आले तर भाव पडतो आणि उत्पादन कमी झाले तर खर्च भरून निघत नाही. त्यामुळे शेतकरी शेती करतो, उत्पादन घेतो; पण त्याच्या हातात स्थिर उत्पन्न राहत नाही.

पारनेरच्या ग्रामीण भागातील शेतकरी शेती सोडत नाही. कारण शेती हीच त्याची उपजीविका आहे. वर्ष संपते, हंगाम संपतो, कर्जाचा हिशोब केला जातो आणि पुन्हा पुढच्या हंगामासाठी त्याच शेतकऱ्याला नव्याने पैसे उभे करावे लागतात. कधी कर्ज फेडण्यासाठी पीक विकावे लागते, तर कधी घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि इतर गरजांसाठी शेतीवरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे शेतकऱ्याचे आयुष्य एका हंगामातून दुसऱ्या हंगामात पुढे सरकत असले, तरी आर्थिक स्थैर्य मात्र दूरच राहते. शेतकरी जगतोय; पण सधन होत नाही, हे पारनेरच्या शेतीसमोरील सर्वात मोठे वास्तव आहे.

पिकासोबत शेतकऱ्याच्या उत्पन्नालाही आधार हवा असतो. फक्त पाणी उपलब्ध करून दिल्याने प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन, आधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक विलिनीकरण, पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि शेतीपूरक व्यवसायांची जोड शेतकऱ्याला द्यावी लागेल. त्याचबरोबर शेतमालाला योग्य बाजारपेठ, साठवणूक सुविधा, प्रकिया उद्योग आणि थेट विक्रीची व्यवस्था उपलब्ध झाली, तर शेतकऱ्यांना उत्पादनातून अधिक मूल्य मिळू शकते.

शेती केवळ कच्चा माल उत्पादक राहू नये, तर आपल्या उत्पादनातून अधिक उत्पन्न निर्माण करणारा उद्योजक बनावा, यासाठी ग्रामीण भागात पूरक व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. प्रश्न केवळ पाऊस पडण्याचा नाही; प्रश्न पडलेल्या पावसाचा प्रत्येक थेंब शेतकऱ्याच्या उत्पन्नात कसा रूपांतरित होणार,याचा आहे. पारनेला दुष्काळाची सवय झाली आहे, आता मात्र शेतकऱ्याला दुष्काळमुक्त भविष्याची गरज आहे.



**– श्री.वसंत रांधवण**
**अहिल्यानगर**
**(जिल्हा प्रतिनिधी)**

### पेरणीपासून काढणीपर्यंत प्रत्येक पावलावर संकट..

शेतकरी पेरणीपूर्वीच खर्चाला सुरुवात करतो. बियाणे, खते, कीटकनाशके, मशागत, मजुरी, डिझेल, वीज आणि वाहतूक यासाठी पैसे उभे करावे लागतात. अनेकदा कर्ज काढून किंवा घरातील बचत खर्च करून तो पिकाची उभारणी करतो. पेरणी झाली की पावसाची चिंता सुरू होते. सुरुवातीला पाऊस झाला नाही तर पेरणी अडकते, पेरणी झाल्यानंतर पावसाने दडी मारली तर उगवलेले पीक धोक्यात येते. पिकाला पाणी मिळाले आणि ते जोमाने वाढले, तर काढणीच्या काळात अवकाळी किंवा अतिवृष्टीचा धोका डोक्यावर असतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्याची शेती म्हणजे केवळ उत्पादन घेण्याचा व्यवसाय राहत नाही; ती दरवर्षी नव्याने जोखीम पत्करण्याची प्रक्रिया बनते.

### पाऊस पडला तर अतिवृष्टी, नाही पडला तर दुष्काळ..!

पारनेरच्या शेतकऱ्याची हीच सर्वात मोठी शोकांतिका आहे. पावसाची प्रतीक्षा केली तर तो येत नाही आणि आला तर अनेकदा कमी कालावधीत मोठ्या प्रमाणावर बरसतो. त्यामुळे पिकाला आवश्यक असलेला संतुलित पाऊस मिळण्याऐवजी कधी पाण्याअभावी पीक करपते, तर कधी अतिवृष्टीमुळे शेतातील माती आणि उभे पीक वाहून जाते. पाऊस पडतो; मात्र तो शेतकऱ्याच्या उपयोगी किती पडतो, हा खरा प्रश्न आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे, ते साठवणे आणि गरजेच्या वेळी शेतीसाठी उपलब्ध करून देणे यावर पुरेसे नियोजन झाले नाही, तर दरवर्षी दुष्काळाच्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे. 'पाणी पडते, पण टिकत नाही; टिकले तर शेतीला पुरेसे मिळत नाही,' ही ग्रामीण भागातील वस्तुस्थिती बदलणे गरजेचे आहे.

### दुष्काळात मदत नव्हे, कायमस्वरूपी आधार हवा..!

दुष्काळ आला की टँकर, चारा, अनुदान, पंचनामे आणि मदतीच्या घोषणा सुरू होतात. ही मदत संकटाच्या काळात शेतकऱ्यासाठी आवश्यक आहे; मात्र ती कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. पारनेरच्या शेतकऱ्याला दर दोन–तीन वर्षांनी दुष्काळी मदतीची गरज पडू नये, यासाठी पाण्याचे नियोजन करावे लागेल. शेततळी, बंधारे, जलसंधारण, नदी–नाला खोलीकरण, जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन, सूक्ष्म सिंचन आणि उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर यावर सातत्याने काम करणे आवश्यक आहे. दुष्काळाच्या वेळी मदत देण्यापेक्षा दुष्काळाच्या काळात शेतकरी अडचणीत येऊ नये, अशी व्यवस्था निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे.

## सल्लागार

अलिकडे पिसाळले
फेसाळलेसल्लागार
सल्ले देत फिरतात
भरगच्च भरे आगार

फुकट वाटती सल्ले
नकोआम्हांस पगार
पटो वा न पटो भले
सल्ले ऐका गप्पगार

कुठे काही खुट होई
चालू होतात एल्गार
विकलेजातात शब्द
चढ्याभावात भंगार

मध्येचं करती गायब
नेते अजब जादुगार
जंगजंग पछाडा तरी
सापडेना ते गुन्हेगार

सल्लयासोबत देतात
फुकटातकौतुकोद्गार
फुंकरघालून फुंकवी
शांत होणारा अंगार

उतू चालले ज्ञानसारे
खालीकरे कोशागार
हल्लेखोर परवडे ते
नको सल्लेखोर गार

खूप मिळे वेठबिगार
एकमागा घ्या हजार
कुणीतर आवरा अरे
सल्ला मास्टर बेजार

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# अक्षराज

## गौरी गणपती विशेष



टाकळी ढोकेश्वर : श्री संत सावतामाळी प्रतिष्ठानच्या श्रींचे पूजन करताना पारनेर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे व मंडळाचे पदाधिकारी



टाकळीढोकेश्वर (ता.पारनेर) येथिल अतुल सैद सर यांच्या घरातील गौरी गणपती पूजनानिमित्त हवामहाल हा आकर्षक देखावा



टाकळी ढोकेश्वर (ता. पारनेर) येथील उषा बाळासाहेब होमकर यांच्या घरातील गौरी गणपती



वसंत बापुराव वडस्कर, वडगाव वार्ड, चंद्रपूर यांचे घरचा गणपती बाप्पा



रणजीत श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे च्या घरचा गणपती बाप्पा



पप्पु पंढरीनाथ पावशे, यंदा ५० वे वर्ष (मु.काकडवाल गांव, तालुका अंबरनाथ,ठाणे,) यांच्या घरच्या गौराई श्री गणराया घणसोली गाव, चिंचाआळी, घणसोली, नवी मुंबई, ठाणे



तुकाराम भोईर (मु. शिळगांव, महाकालेश्वर मंदिर जवळ, पोस्ट पडले, ता.जि ठाणे,) यांचा घरचा गणपती बाप्पा



शिवा बुधाजी आलिमकर (मु. शिळगांव, मराठी शाळा जवळ, पोस्ट पडले, ता.जि ठाणे,) यांचा घरचा गणपती बाप्पा



चंद्रकांत जयराम पाटील (मु. कोपरखैरणे गाव, नवी मुंबई, जिल्हा ठाणे) यांच्या घरच्या गौराई



दिपक नारायण म्हस्कर (मु.डायघर गांव, पोस्ट पडले, ता जि. ठाणे) यांच्या घरचा गणपती बाप्पा



जयसिंग शिंदे, (अंबिका नगर रेल्वे स्टेशन जवळ, वासिंद, ता.शहापुर जि.ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा



आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान आगासन दिवाच्या अध्यक्षा उषा मुंडे यांचा घरचा गणपती बाप्पा (आगासन गांव, ता. जि. ठाणे)



समाजसुधारक हिंदुस्तानी मित्र मंडळ, जय भवानी नगर, पौड रोड, कोथरूड, पुणे



गोळीबारचा महाराजा म्हणून ख्याती असलेल्या घाटकोपर पश्चिमेतील श्री गणेश सार्वजनिक उत्सव मंडळाची सुवर्ण मुकुटधारी विलोभनीय गणेशमूर्ती.



सुमित क्षिरसागर यांच्या घरातील गौर गणपती, महाबळेश्वर, जि.सातारा

# महिला शेतकऱ्यांच्या सशक्तीकरणासाठी महाराष्ट्राचे ऐतिहासिक पाऊल !

## ‘महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६’ लागू ; २ ऑक्टोबरच्या ग्रामसभेत विशेष मान्यता

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२०, नांदेड :** ग्रामीण महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राचा खरा कणा असलेल्या महिला शेतकऱ्यांना अखेर अधिकृत ओळख आणि हक्क मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६’ अंमलात आणला आहे. अन्नसुरक्षा, शाश्वत शेती आणि ग्रामीण कुटुंबांच्या कल्याणात म हिलांचे योगदान अनन्यसाधारण आहे. याच योगदानाला सन्मानित करत महिला शेतकऱ्यांना अधिकृत ‘महिला शेतकरी प्रमाणपत्र’ देऊन त्यांचे सर्वांगीण सक्षमीकरण करणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

या ऐतिहासिक योजनेची अमलबजावणी जलद गतीने होण्यासाठी आणि जिल्ह्यातील प्रत्येक पात्र महिला शेतकऱ्यापर्यंत याचा लाभ पोहोचवण्यासाठी जिल्हा प्रशासनाला विशेष मोहीम राबवावी लागणार आहे.

**‘महिला शेतकरी प्रमाणपत्रा’ मुळे मिळणार हे थेट फायदे :**

**अधिकृत ओळख व मान्यता :** महिला शेतकऱ्यांना शासकीय अभिलेखात स्वतंत्र ओळख मिळणार.

**शासकीय योजनांचा थेट लाभ :** कृषी विभागाच्या




सर्व अनुदान आणि सवलतीच्या योजनांमध्ये प्राधान्य.

**कृषी निविष्ठांची उपलब्धता :** उच्च दर्जाची बियाणे, खते आणि औषधे सुलभरीत्या उपलब्ध होणार.

**अर्थसहाय्य व सुलभ पतपुरवठा :** बँकांकडून राष्ट्रीयीकृत व पीककर्ज मिळणे सोपे होणार.

**सर्वसमावेशक पीकविमा :** नैसर्गिक आपत्तीच्या काळात जोखीम कमी होऊन आर्थिक सुरक्षा मिळणार.

**विस्तार सेवा व तांत्रिक मार्गदर्शन :** आधुनिक शेती तंत्रज्ञान, सल्ला आणि प्रशिक्षणाचा थेट लाभ

**२ ऑक्टोबरची ‘विशेष ग्रामसभा’ ठरणार निर्णायक; वेळेचे मोठे आव्हान!**

या अधिनियमांतर्गत लाभ मिळवण्यासाठी Mahila Shetkari Portal वर महिला शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरू झाली आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर २ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या विशेष ग्रामसभेत या अर्जांना मंजुरी मिळणे अनिवार्य आहे.

gram-level वर अर्ज नोंदणीसाठी फार कमी वेळ शिल्लक असल्याने प्रत्येक गावातून जास्तीत जास्त अर्ज भरून घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कृषी विभाग, महसूल विभाग आणि ग्रामविकास यंत्रणेची संयुक्त मोहीम आखणे अत्यंत गरजेचे बनले आहे.

**प्रशासकीय आवाहनाचा टप्पा : जिल्हाधिकाऱ्यांचे नेतृत्व ठरणार महत्त्वाचे...**

महिला शेतकरी सक्षम झाल्यास शेती, कुटुंब आणि संपूर्ण समाज समृद्ध होईल.

हे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात आणण्यासाठी जिल्हा स्तरावर व्यापक जनजागृती, कृषी सहाय्यक व ग्रामसेवकांना तातडीचे निर्देश आणि २ ऑक्टोबरपर्यंत ’मिशन मोड’वर काम करण्याचे नियोजन जिल्हाधिकारी साहेबांच्या म ार्गदर्शनाखाली होणे अपेक्षित आहे.

वेळ कमी आहे, त्यामुळे आजच Mahila Shetkari Portal वर नोंदणी करून ग्रामीण भागातील प्रत्येक महिलेला शेतीचा अधिकृत हक्क मिळवून देण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# नाशिक जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करा; स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा एकमुखी ठराव

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२१, विंचूर (नाशिक) :** नाशिक जिल्ह्यात गेल्या दीड महिन्यापासून पावसाने पूर्णपणे दडी मारल्यामुळे खरीप पिके करपून गेली असून, शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने संपूर्ण नाशिक जिल्हा तत्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करावा, असा एकमुखी ठराव स्वाभिम ानी शेतकरी संघटनेच्या जिल्हास्तरीय बैठकीत मंजूर करण्यात आला. या म ागणीचे निवेदन येत्या २४ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात येणार आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष घनश्याम चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली लासलगाव येथे ही म हत्त्वाची जिल्हास्तरीय बैठक पार पडली.



बैठकीत शेतकऱ्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. जिल्ह्यात पावसाअभावी निर्माण झालेली परिस्थिती अत्यंत गंभीर असून बळीराजा संकटात सापडला आहे. शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी लावून धरली.

१० ऑक्टोबरच्या ऊस परिषदेत सहभागी होण्याचा निर्धार ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी येत्या १० ऑक्टोबर रोजी जयसिंगपूर येथे भव्य ऊस परिषद होणार आहे. या परिषदेत नाशिक जिल्ह्यातील शेतकरी आणि संघटनेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होतील, असा निर्णयही या बैठकीत सर्वानुमते घेण्यात आला.

या बैठकीस संघटनेचे राज्य सम न्वयक कुबेर जाधव, उत्तर महाराष्ट्र सरचिटणीस प्रभाकर बेंडकुळे, महिला आघाडी अध्यक्षा अनिताताई कोल्हे, उपाध्यक्ष सुनंदा दाते, उपाध्यक्ष रवींद्र शेवाळे, सरचिटणीस मच्छिंद्र जाधव, सिन्नर तालुकाध्यक्ष आत्माराम पगार, निफाड तालुकाध्यक्ष गजानन घोटेकर, दिंडोरी तालुकाध्यक्ष सोमनाथ कावळे, मालेगाव तालुकाध्यक्ष संजय जाधव, सिन्नर तालुका महिला आघाडी अध्यक्षा मनीषा पगार, बाजार समिती सचिव नरेंद्र वाढवणे, व्यापारी असोसिएशनचे प्रवीण कदम यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे पाटील यांनी केले, तर येवला तालुकाध्यक्ष विलास दरगुडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# संजय ढवस यांची राष्ट्रीय ओबीसी व्यापारी व उद्योजक महासंघाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या राष्ट्रीय ओबीसी व्यापारी व उद्योजक महासंघाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी संजय उद्धवराव ढवस यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच तरुण पटेल यांची समन्वयक उत्तर प्रदेश यांची पण नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी हैदराबाद येथे आयोजित ओबीसी ठिय्या आंदोलनाच्या नियोजन बैठकीदरम्यान ही नियुक्ती जाहीर केली.

यावेळी श्रीनिवास जाजुला गौड, अध्यक्ष बीसी वेल्फेअर असोसिएशन, सचिन राजुरकर महासचिव, राष्ट्रीय ओबीसी महासंघ, पूनम प्रभाकर गौड ओबीसी मंत्री तेलंगणा राज्य, सुरेश शेखर खासदार, हनुमंतराव प्रमुख सल्लागार तथा माजी खासदार, सुधाकर अडबाले आम दार यांच्यासह विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

नियुक्तीपत्राद्वारे संजय उद्धवराव ढवस यांना संघटनेच्या ध्येय-धोरणांशी सुसंगत राहून स्थानिक, राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील विविध उपक्रम व कार्यक्रमांम ध्ये सक्रिय सहभाग घेऊन संघटनेचे कार्य अधिक व्यापक व प्रभावी करण्यासाठी कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ओबीसी समाजातील व्यापारी, उद्योजक, लघुउद्योजक आणि नवउद्योजकांच्या विविध प्रश्नांना संघटित व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या अडचणी शासन व संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविणे तसेच व्यवसाय आणि उद्योजकतेच्या माध्यमातून समाजाचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी प्रयत्न करणे, या उद्देशाने आगामी काळात कार्य करण्याचा संकल्प संजय उद्धवराव ढवस यांनी व्यक्त केला. त्यांच्या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, व्यावसायिक आणि संघटनात्मक स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय ओबीसी व्यापारी व उद्योजक महासंघाचे कार्य देशभर अधिक व्यापक होण्याची




अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

हैदराबाद येथे झालेल्या या बैठकीस तरुण पटेल, उत्तर प्रदेश, संतोष कुमार गुप्ता, छत्तीसगड, लक्ष्मण यादव, कर्नाटक, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे पदाधिकारी, तसेच इकबाल अन्सारी, माजी सदस्य, राज्य मागासवर्गीय, प्रकाश साबळे, सुभाष घाटे, शरद वानखेडे, गुणेश्वर आरिकर, शकील पटेल, बबन नाखले, भैय्या लडके, शेंडे सर, राहुल तायडे, मुकेश पुडके, रवी झाडे यांच्यासह राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे पदाधिकारी,रत्नमाला पिसे, अध्यक्षा, राष्ट्रीय ओबीसी महिला महासंघ,पार्वती शाहू, रेखा शाहू, रायपूर, राष्ट्रीय ओबीसी महासंघ शंकरअण्णा, अध्यक्ष आंध्रप्रदेश बीसी वेल्फ ेअर असोसिएशन, प्रा. पी. एल. विश्वासराव, प्रा. व्यंकटरमण, प्रा. व्यंकटेश्वरम, तेलंगणा बीसी वेल्फेअर असोसिएशनचे क्रांती गौड, के. श्रीनिवास मुद्रास, विक्रम गौड, शाम कुर्मा, मनी मंजिरी, गणेश चारी, प्रा. मलेश्वरम यांच्यासह अन्य पदाधिकारी व मान्यवरांचीही उपस्थिती होती.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने राजोलीला स्वतंत्र वीज वितरण केंद्र मंजूर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** नागरिकांच्या प्रश्नांना आपला प्रश्न मानून ते मार्गी लागेपर्यंत सातत्याने पाठपुरावा करणारे आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना पुन्हा एकदा यश मिळाले आहे. राजोली व परिसरातील नागरिकांच्या वीजविषयक अडचणी अधिक जलद आणि स्थानिक पातळीवर सोडविता याव्यात, यासाठी मूल शहर व मूल ग्रामीण शाखा कार्यालयाचे विभाजन करून नवीन राजोली वीज वितरण केंद्र निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी पत्राद्वारे ही माहिती आ. मुनगंटीवार यांना दिली असून, या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी आ. मुनगंटीवार यांनी



माननीय मुख्यमंत्री यांचे आभार मानले आहेत.

राजोली व परिसरातील नागरिकांना वीजपुरवठ्याशी संबंधित समस्या, नवीन वीज जोडणी, तांत्रिक अडचणी, देखभाल-दुरुस्ती तसेच इतर सेवांसाठी मूल येथील कार्यालयावर अवलंबून राहावे लागत होते. या पार्श्वभूमीवर राजोली येथे स्वतंत्र वीज वितरण केंद्र निर्माण करण्याची मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे सातत्याने मांडली होती. या पाठपुराव्याची दखल घेत मूल शहर व मूल ग्राम ीण शाखा कार्यालयाचे विभाजन करून नवीन राजोली वीज वितरण केंद्र कार्यालय निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी आ. मुनगंटीवार यांना पाठविलेल्या पत्रातून ही बाब स्पष्ट केली आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राजोली येथे नवीन वीज वितरण केंद्राची निर्मिती होत असून, या स्वतंत्र केंद्रामुळे परिसरातील नागरिकांना वीज वितरणाशी संबंधित तक्रारी व समस्या स्थानिक पातळीवरच मांडता येणार आहेत. वीजपुरवठ्यातील अडचणी, देखभाल-दुरुस्ती, नवीन वीज जोडण्या तसेच ग्राहक सेवेशी संबंधित प्रश्नांच्या निवारणाला यामुळे अधिक गती मिळणार आहे. नागरिकांना आपल्या प्रश्नांसाठी दूरवर जावे लागू नये आणि स्थानिक पातळीवरच त्यांच्या अडचणींचे जलद निराकरण व्हावे, हा आ. मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामागील प्रमुख उद्देश होता.

## थोडक्यात बातम्या

# पडले गाव दुमदुमले हरिनामाने; ‘गजर हरिनामाचा’मध्ये अवतरले पंढरपूर-आळंदी

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.२०, पडलेगांव (ठाणे) :** श्री गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर पडले गावात दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी एक अविस्मरणीय भक्ती सोहळा पार पडला. ठाणे महापालिकेच्या नगरसेविका सौ. वेदिका साहिल पाटील यांच्या निवासस्थानी आणि त्यांच्या घरी अनंत चतुर्दशी निमित्त विराजमान असलेल्या गणपती बाप्पाच्या साक्षीने ’गजर हरिनामाचा – हरिनामाच्या गजरात, भक्तीचा जागर करूया!’ या भव्य हरिपाठ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ठीक ६ वाजता या भक्तिमय कार्यक्रमाची सुरुवात झाली. रात्री ८ वाजेपर्यंत हरिपाठ, आरती असे भक्तिमय कार्यक्रम सुरू होते आणि त्यानंतर महाप्रसादाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली.

पहाटेपासूनच मंडपात झेंडूच्या माळा, रांगोळ्या आणि टाळ-मृदुंगाच्या निनादाने परिसर भारून गेला होता. परिसरातील १० पेक्षा जास्त महिला हरिपाठ मंडळांनी पांढऱ्या-हिरव्या, निळ्या, पिवळ्या, जांभळ्या साड्यांमध्ये एकसुरात हरिपाठ सादर केला. शेकडो महिलांच्या मुखातून निघणारा ‘ज्ञानोबा-तुकाराम’चा गजर ऐकून उपस्थित प्रत्येकाला जणू आपण प्रत्यक्ष पंढरपूरच्या वाळवंटात किंवा आळंदीच्या इंद्रायणी काठी आहोतअसा भास होत होता. या सोहळ्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वजण गजर हरिनामाच्या भक्ती जागरात मग्न होऊन रमून गेले होते. यावेळी वेदिका साहिल पाटील म्हणाल्या, हा गजर माझा नसून माझ्या पडले गावातील प्रत्येक माय-बहिणीचा आहे. तुम्ही सर्वांनी मिळून इथे पंढरपूर आणलं. उपस्थित भाविकांनी आयोजकांचे भरभरून कौतुक केले.

# ८ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**अक्षराज : जफर शेख**




**दि.२१, जिंतूर (परभणी) :** जिंतूर येथीलक्रीडा संकुलात नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धे त बोरी येथील साईकृपा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विद्यालयातील तब्बल ८ विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. तालुकास्तरीय स्पर्धेत विविध वयोगटांमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धी चातुर्याचा, एकाग्रतेचा आणि उत्कृष्ट खेळ कौशल्याचा परिचय करून दिला. प्रतिकूल परिस्थितीत ही डावपेच आखत प्रतिस्पर्ध्यांना चांगली टक्कर देत साईकृपा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. श्रेया धनंजय चौधरी, वैष्णवी अंबादास कदम, समर्थ गोपाल टाक, प्राची संदीप हरीविठ्ठल, जिकरा युनूस शेख, वेदिका गजानन बडवणे, तल्हाराफे जुबेर शेख,योगेश पंढरीनाथ डुकरे. या सर्व विद्यार्थ्यांचीजिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवडझाली असून, त्यामुळे साईकृपा विद्यालयाच्या शैक्षणिक तसेच क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दलसाईकृपा विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, संस्थेचे पदाधिकारी तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, संयम, नियोजन, तर्कशक्ती आणि निर्णयक्षमता विकसित करणारा खेळ आहे. या गुणांचा उपयोग करत साईकृपा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरावर आपली छाप पाडली असून आता जिल्हास्तरावर ही चांगली कामगिरी करण्यासाठी ते सज्ज झाले आहेत.साईकृपा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशामुळेबोरी परिसरातून त्यांचे कौतुक होत असून विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा अधिक बळकट झाली आहे.

# बबाबाई सुखदेव लिंगायत यांचे निधन

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.२१, लासूर स्टेशन (छ.संभाजीनगर) :** जेष्ठ नागरिक बबाबाई सुखदेव लिंगायत (वय १०० वर्षे) रा.सिद्धनाथ वाडगांव ता गंगापुर यांचे सोमवार, दि.२१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७:२० वाजता वृध्दपकाळाने निधन झाले. सिध्दनाथ वाडगाव येथील स्मशानभुमीत त्यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि.२२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार जितेंद्र लिंगायत यांच्या त्या आजी होत्या.

# तलाठी संघटनेच्या देगलूर तालुका अध्यक्षपदी रातोळीकर यांची बिनविरोध निवड

**अक्षराज : अशोक लोणीकर**



**दि.२१, मुखेड (नांदेड) :** नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथे झालेल्या एका बैठकीत तलाठी संघटनेच्या देगलूर तालुका अध्यक्षपदी डी. जी. रातोळीकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तलाठी संघटनेचा मागील कार्यकाळ संपल्यानंतर देगलूर येथे नव्याने अध्यक्षपदाची निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जाणारे डी.जी.रातोळीकर यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तलाठी हा महसूल विभागातील म हत्त्वाचा घटक असून, त्यांचा जनतेशी थेट संपर्क असतो. त्यामुळे तलाठी संघटनेच्या अध्यक्षावर तालुक्यातील कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करण्याची महत्त्वाची जबाबदारी असते. कर्मचाऱ्यांच्या अडचणी आणि समस्या शासनापर्यंत पोहोचवणे, तसेच काम ाच्या ठिकाणी येणाऱ्या विविध अडचणींमध्ये मार्गदर्शन करणे, ही अध्यक्षांची प्रमुख भूमिका असते. पूर, दुष्काळ किंवा अतिवृष्टीसारख्या परिस्थितीत पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी तलाठी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर काम करतात. अशा वेळी योग्य समन्वय आणि मार्गदर्शन महत्त्वाचे ठरते. डी.जी.रातोळीकर यांच्या बिनविरोध निवडीबद्दल संघटनेचे पदाधिकारी, शेतकरी नेते आणि नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## थोडक्यात बातम्या

### चनकापूर येथे यूथ युनिटी मंडळातर्फे मेडिकल कॅम्पचे आयोजन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** खापरखेडा नजिकच्या हनुमान टेकडी, चनकापूर येथे यूथ युनिटी सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त मेडिकल कॅम्पचे आयोजन करण्यात आले. या आरोग्य शिबिराचा परिसरातील नागरिकांनी लाभ घेतला. यावेळी नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन देण्यात आले. या मेडिकल कॅम्पमध्ये डॉ. शुभम लेखरा, डॉ. शशांक वानखेडे, डॉ. मनोज पांडे आणि डॉ. गुफरान सिद्दीकी यांनी सेवा देत उपस्थित नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. मंडळाचे अध्यक्ष प्रदीपकुमार बल्केश्वर प्रसाद यांनी सांगितले की, गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक कार्यक्रमांसोबतच समाजसेवा व जनकल्याणाचे उपक्रम राबविणे हा मंडळाचा प्रमुख उद्देश आहे. नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी मंडळाचे सचिव कमलेश यादव, उपाध्यक्ष संतोष सुखनंदन प्रसाद कश्यप, कोषाध्यक्ष संजय मुसाफिर राम कुरील यांच्यासह परशुराम रामजीत यादव, विजय रामप्रवेश प्रसाद, दिलीप शर्मा, अरविंद सुखनंदन प्रसाद, संदीपकुमार बल्केश्वर प्रसाद, विजय पंचम कैथल, विपिन यादव, प्रकाश सूर्यवंशी, आस्तिक बागडे, निखिल वैश्य, रोहित गुप्ता आणि राम यादव उपस्थित होते. कार्यक्रमात राहुल तिवारी, कृष्ण यादव यांच्यासह परिसरातील इतर मान्यवर नागरिकांनीही सहभाग घेतला. मेडिकल कॅम्प यशस्वी करण्यासाठी मंडळाच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी सहकार्य केले. यूथ युनिटी सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाने या उपक्रमातून 'भक्तीसोबत सेवा आणि समाजासोबत आरोग्य' हा सामाजिक संदेश दिला.

## चारठाण्यात Jio धोक्यात! रिचार्जला पैसे, पण नेटवर्कसाठी लाईटची वाट?

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.२१, चारठाणा (परभणी) :** अलीम शेख– रिचार्ज करा वेळेवर, पण नेटवर्क वापरा लाईट आल्यावरच! अशी अजब परिस्थिती सध्या चारठाणा बाजारपेठेत निर्माण झाली आहे. जिओच्या सततच्या नेटवर्क गायब होण्याने नागरिक अक्षरशः वैतागले आहेत.

दिवसभर 'Searching...'

मागील १५ दिवसांपासून चारठाण्यात जिओचे नेटवर्क लपंडाव खेळत आहे. सकाळी फोन हातात घेतला की स्क्रीनवर फक्त 'No Service'. कधीतरी रेंज आलीच तर कॉल केला की पलीकडचा आवाज ऐकूच येत नाही. हॅलो.. हॅलो.. करतच अर्धा दिवस जातोय, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्राहक देत आहेत.

ऑनलाईन धंदा ठप्प!

चारठाणा ही या भागातील सर्वात मोठी बाजारपेठ. किराणा दुकानापासून कापड दुकानापर्यंत सगळीकडे णझख, झहेपशझश, त्रझरू ने व्यवहार होतात. पण नेटवर्कच नाही तर पेमेंट होणार कसं? ग्राहकांकडे कॅश नसते आणि दुकानदाराचा धंदा बुडतो. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन क्लासेसही बंद पडत आहेत.

अधिकारी बेपत्ता!

याबाबत जिओच्या अधिकाऱ्यांना फोन केला तर फोन उचलला जात नाही, उचलला तरी लवकरच सुरु होईल एवढंच उत्तर मिळतंय. टॉवरच्या बॅटरीचा प्रॉब्लेम आहे की दुसरं काही, याचं उत्तर कोणीच देत नाही.

जिओने जर तातडीने यावर तोडगा काढला नाही, तर चारठाणेकर दुसऱ्या कंपनीत पोर्ट करण्याच्या तयारीत आहेत.

## आर्या राजची तायक्कांदोमध्ये सुवर्ण झेप; SGFI साठी निवड




**अक्षराज : मंगेश औटी**

**दि.२१, वाशी (नवी मुंबई) :** कठोर मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर गोल्ड क्रेस्ट इंटरनॅशनल स्कूल, वाशीची तायक्कांदो पटू आर्या राज हिने ISSO राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेत अंडर-१९ वयोगटात सुवर्णपदक पटकावले. नीता मुकेश अंबानी स्कूल येथे झालेल्या या स्पर्धेतील तिच्या दमदार कामगिरीमुळे आर्याची SGFI साठी निवड झाली आहे. आर्या राज वॉरियर तायक्कांदो अकादमी येथे प्रशिक्षक मंगेश औटी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे. तंत्र, वेग, ताकद, फिटनेस, लवचिकता आणि स्टॅमिना यासह स्पर्धात्मक तयारीवर तिच्या प्रशिक्षणात विशेष भर दिला जातो. नियमित आणि कठोर सरावाला जिद्दीची जोड देत आर्याने राष्ट्रीय स्तरावर आपल्या खेळाची छाप उमटवली. तिच्या या यशाबद्दल शाळा, वॉरियर तायक्कांदो अकादमी, प्रशिक्षक मंगेश औटी आणि कुटुंबीयांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. सुवर्णपदकानंतर SGFIची संधी मिळवत आर्याने आपल्या तायक्कांदो प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

## पर्यावरणपूरक उपक्रम; गौरी-गणपती विसर्जनातील निर्माल्यापासून गांडूळ खत



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२१, डायघरगांव (ठाणे) :** गौरी-गणपती विसर्जनादरम्यान जमा होणारे निर्माल्य तलावात न टाकता त्यापासून गांडूळ खत तयार करण्याचा पर्यावरणपूरक उपक्रम डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) यांच्या सदस्यांमार्फत राबविण्यात येत आहे. डायघर तलाव तसेच देसाई-शील परिसरातील गणपती विसर्जन तलाव ठिकाणी श्री सदस्यांनी स्टॉल लावून भाविकांकडून निर्माल्य जमा करण्यास सुरुवात केली आहे. पर्यावरण संरक्षणाकरिता निर्माल्य कलशामध्ये टाकावे असे आवाहन फलकाद्वारे करण्यात येत आहे.

जमा करण्यात आलेले सर्व निर्माल्य उंबर्ली (ता. कल्याण) येथे नेण्यात येऊन तेथे त्यावर प्रक्रिया करून गांडूळ खत तयार केले जाते. या उपक्रमामुळे तलावातील प्रदूषणाला आळा बसत असून शेतीसाठी उपयुक्त खतही मिळत आहे.

हा उपक्रम पर्यावरण संवर्धनासाठी आदर्श असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# पालम तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करा

## 'आपले पालम ' व्हॉट्सअॅप ग्रुप व शेतकऱ्यांच्या वतीने रास्ता रोको; तहसीलदारांना निवेदन

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२१, पालम (परभणी) :** चालू खरीप हंगामात पालम तालुक्यात अत्यल्प पाऊस झाल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. त्यामुळे पालम तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत, पीक विमा व इतर शासकीय सवलती जाहीर कराव्यात, अशी मागणी 'आपले पालम' व्हॉट्सअॅप ग्रुपच्या वतीने व तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली.




या मागणीसाठी सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी पालम शहरातील मुख्य चौकात 'आपले पालम' व्हॉट्सअॅप ग्रुपचे सदस्य व बहुसंख्य शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी जेष्ठ नेते गणेशराव रोकडे, निवृत्ती हत्तीआंबिरे, वैजनाथ हत्तीआंबिरे, सितारामजी पौळ, सतीश बनसोडे, देवानंद हत्तीआंबिरे, नरसिंग रोकडे आदींनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडत शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी केली. रास्ता रोको आंदोलनादरम्यान तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे यांना 'आपले पालम' व्हॉट्सअॅप ग्रुप व शेतकऱ्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

यावेळी अल्प पावसामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची माहिती देत शासनाने तातडीने उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी 'आपले पालम' व्हॉट्सअॅप ग्रुपचे अ‍ॅडमिन विलास चव्हाण यांच्यासह भैय्या शिरसकर, गजानन देशमुख, पद्दुदेवा जोशी, सलमान पठाण, मारुती नाईकवाडे, गणेश हत्तीआंबीरे, भगवान शिरसकर, रामप्रसाद कदम, आनंद साखला, कल्याण सिरस्कार, माऊली घोरपडे, मंगेश घोरपडे, माधव रोकडे, सुजित मालेवर, यांच्यासह ग्रुपचे सदस्य आणि तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, रास्ता रोको आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक आदित्य लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## मुंबई मध्ये प्रभाग स्तरावरील बाल संरक्षण समिती अद्याप का नाही? बालसभेत मुलांचा सवाल?

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२१, गोवंडी (मुंबई) :** देवणार प्रभाग स्तरावर बाल संरक्षण समितीची स्थापना अद्याप झालेली नसल्याचा मुद्दा उपस्थित करत मुलांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. धणतअ संस्था आणि बाल अधिकार संघर्ष संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने मानखुर्द येथे आयोजित बालसभेत मुलांनी आपल्या परिसरातील आरोग्य, शिक्षण, स्वच्छता आणि सुरक्षिततेशी संबंधित विविध समस्या मांडल्या. आमची प्रभाग स्तरावरील बाल संरक्षण समिती' या प्रमुख विषयावर आयोजित करण्यात आलेल्या या बालसभेचा उद्देश प्रभाग पातळीवर बाल संरक्षण यंत्रणा अधिक सक्षम करून मुलांच्या हक्कांचे, आरोग्याचे, शिक्षणाचे आणि सुरक्षिततेचे प्रभावी संरक्षण करण्याबाबत जनजागृती करणे हा होता. बालसभेच्या प्रारंभी बाल अधिकार संघर्ष संघटनेच्या बालसाथींनी 'CPC क्या है?' या विषयावर पथनाट्य सादर केले. पथनाट्याच्या माध्यमातून बाल संरक्षण समितीची भूमिका, तिच्या जबाबदाऱ्या तसेच मुलांच्या संरक्षणासाठी या समितीचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. यानंतर झालेल्या चर्चेत मुलांनी आपल्या परिसरातील विविध प्रश्न मांडले. परिसरातील अस्वच्छता, सुरक्षित वातावरणाचा अभाव, शिक्षणातील अडचणी तसेच बाल संरक्षणाशी संबंधित समस्यांबाबत मुलांनी आपले अनुभव आणि मते व्यक्त केली.




या समस्यांचा मुलांच्या दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम यावरही चर्चा झाली. महाराष्ट्र शासनाच्या १० जून २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रभाग स्तरावर बाल संरक्षण समिती गठीत करण्याची तरतूद असल्याचे सांगण्यात आले. मात्र, आपल्या प्रभागात अद्याप अशी समिती स्थापन झालेली नसल्याचा मुद्दा मुलांनी बालसभेत उपस्थित केला. मुलांच्या या प्रश्नांची दखल घेऊन संबंधित यंत्रणांनी आवश्यक कार्यवाही करून प्रभाग स्तरावरील बाल संरक्षण यंत्रणा कार्यान्वित करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. स्थानिक पातळीवरील बाल संरक्षण व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध शासकीय आणि स्थानिक यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वयाची आवश्यकता असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

YUVA संस्थेचे बाल अधिकार कार्यकर्ते प्रकाश भवरे यांनी बाल संरक्षण समितीची भूमिका, जबाबदाऱ्या आणि मुलांच्या संरक्षणाच्या दृष्टीने तिचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. बालसभेच्या माध्यमातून मुलांनी केवळ आपल्या समस्या मांडण्यापुरते मर्यादित न राहता, त्यांच्या प्रश्नांवर स्थानिक पातळीवर निर्णय घेणाऱ्या यंत्रणांनी गांभीर्याने विचार करून कार्यवाही करण्याची गरज व्यक्त केली. मुलांसाठी सुरक्षित, संवेदनशील आणि पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रशासन, स्थानिक संस्था आणि समुदायाने समन्वयाने काम करण्याची आवश्यकता यावेळी अधोरेखित झाली. बालसभा यशस्वी करण्यासाठी बाल अधिकार संघर्ष संघटनेचे बालसाथी, वस्ती बाल संरक्षण समितीचे सदस्य तसेच धणतअ संस्थेच्या प्रतीक्षा आणि जरीन यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## 'सेवा संकल्प अभियानातून' आदिवासी नागरिकांना शासकीय योजनांची माहिती

### ऐबूर - ऐरंबी आश्रमशाळेत उत्साहात आयोजन; आमदार विलास तरे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२१, पालघर :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले 'सेवा संकल्प अभियान' शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, एंबूर-ऐरंबी, ता. जि. पालघर येथे सोमवार, दिनांक २१ सप्टेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या अभियानाच्या माध्यमातून आदिवासी समाजातील नागरिक, पालक व विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजना, शैक्षणिक सुविधा तसेच शासनाच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष बोईसर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विलास तरे यांच्या हस्ते फीत कापून अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रकल्प कार्यालय डहाणूचे कार्यालयीन अधीक्षक योगेश खंदारे यांनी आदिवासी समाजातील नागरिकांसाठी शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. तसेच चित्रफितीच्या माध्यमातून योजनांची माहिती व लाभ घेण्याची प्रक्रिया समजावून सांगत उपस्थित लाभार्थी, पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

गावचे सरपंच सुदर्शन वनगा व ग्रामसेवक भागवत कांबळे यांनी ग्रामस्थांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार विलास तरे यांनी विद्यार्थी व पालकांनी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा




लाभ घ्यावा, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सोयी-सुविधांचा योग्य उपयोग करून शिक्षणाच्या माध्यमातून आपले भविष्य उज्ज्वल करावे, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमास सरपंच सुदर्शन वनगा, प्रकल्प कार्यालय डहाणूचे अधीक्षक योगेश खंदारे, आदिवासी विकास निरीक्षक यदुनाथ भोये, रोहित पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी दिपक गवई, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लक्ष्मण दळवी प्राध्यापक ईश्वर माळी यांच्यासह पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गोंटलेवार यांनी केले, तर विष्णू खोडवे यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. उपस्थित पालकांसाठी भोजनाची व्यवस्था ही करण्यात आली होती. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

## लोकसभा अधिवेशन दरम्यान दिल्लीत होणार ओबीसी गुंज; हैदराबाद येथे नियोजन बैठक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** भारत सरकारने राजपत्राच्या प्रश्नावली मध्ये ओबीसी साठी स्वतंत्र्य कॉलम ची सूची नसल्याने, २०२७ जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलमचा समावेश करण्यात यावा, या मागणीसाठी दिल्ली येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ठिय्या आंदोलनाच्या नियोजन बैठक हॉटेल टुरिझम प्लाझा हैदराबाद येथे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, बिसी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष श्रीनिवास जाजुला गौड, महासंघाचे महासचिव सचिन राजुरकर यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाली. यावेळी तेलंगणा राज्याचे ओबीसी मंत्री पूनम प्रभाकर गौड, खासदार सुरेश शेखर, प्रमुख सल्लागार माजी खासदार हनुमंतराव, आ. सुधाकर अडबाले यांच्या उपस्थितीत बैठक झाली. ओबीसी मंत्री पूनम प्रभाकर गौड बोलताना म्हणाले की, तेलंगणा राज्य सरकारने ज्या प्रकारे ओबीसी जातीची



यादी देऊन सर्वे केला त्या पद्धतीने २०२७ ची जनगणना करावी असे बोलले.

गॅजेट च्या प्रश्नावली ओबीसींचा कॉलम नसेल तर जनगणना करून काहीही फायदा होणार नाही असेही म्हणाले, महासचिव सचिन राजुरकर यांनी रामलीला मैदानावर आंदोलनाची रूपरेषा कशी असेल त्यावर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात बबनराव तायवाडे म्हणाले की, जो पर्यंत ओबीसी समाज आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरणार नाही तोपर्यंत समाजाला न्याय मिळणार नाही असे बोलत होते. येथे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे उत्तर प्रदेशचे तरूण पटेल, छत्तीसगडचे संतोष कुमार गुप्ता, कर्नाटकचे लक्ष्मण यादव, राज्य मागासवर्गीय आयोगाने माजी सदस्य इकबाल अन्सारी, प्रकाश साबळे, सुभाष घाटे, शरद वानखेडे, गुणेश्वर आरीकर, संजय ढवस, शकील पटेल, बबन नाखले, भैय्यां लडके, शेंडे सर, राहुल तायडे, मुकेश पुडके, रवी झाडे, राष्ट्रीय ओबीसी महिला महासंघाच्या अध्यक्षा रत्नमाला पिसे, रायपूरच्या पार्वती शाहू, रेखा शाहू आंध्रप्रदेश, बीसी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष केसांना शंकरअण्णा, प्राफेसर पी एल. विश्वासराव, प्राफेसर व्यंकटरमण, प्रोफेसर व्यंकटेश्वरम क्रांती गौड, तेलंगणा बिसी वेल्फेअर असोसिएशनचे के श्रीनिवास मुद्रास, विक्रम गौड, शाम कुर्मा, मनी मंजिरी, गणेश चारी, प्रोफेसर मलेश्वरम आणि , गोवा , दिल्ली, महाराष्ट्र राज्यातील पदाधिकारी उपस्थित होते.